मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशी दुर्घटनेप्रकरणी मुख्य अभियंत्यासह कार्यकारी अभियंता निलंबित

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दोघांच्या विभागीय चौकशीचे आदेश दिले

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी कचरा डेपोत घडलेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. कर्तव्यात निष्काळजीपणा, शासकीय कामात हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामास अभय दिल्याचा ठपका दोघांवर ठेवण्यात आला आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोत 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या तीन मजली अनधिकृत इमारतीवर कचऱ्याचा डोंगर कोसळून झालेल्या या भीषण दुर्घटनेत नऊ कामगारांचा मृत्यू झाला असून १२ कामगार जखमी झाले आहेत. या घटनेप्रकरणी अँटोनी लारा रिन्युव्हेबल एनर्जी कंपनीला दुर्लक्ष, कर्तव्यात कसुर आणि सुरक्षेतील गंभीर निष्काळजीपणाबाबत महापालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी सोमवारी कारणे दाखवा नोटीस बजाविली होती. मंगळवार सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुलासा न केल्यास कंत्राट रद्द आणि बँक हमी जप्त करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार कंपनीने मंगळवारी खुलासा सादर केला आहे.

त्याचबरोबर महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांचा पदभार काढून त्यांनाही आयुक्तांनी कारणे दाखवा नोटीस बजावून मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दोघांनीही खुलासे सादर केले होते. दोघांचेही खुलासे असमाधानकारक, तथ्यहीन आणि शासकीय व महापालिका नियमांचे समर्थन करणारे नसल्याचे म्हटले आहे. कर्तव्यात निष्काळजीपणा, शासकीय कामात हलगर्जीपणा, अधिकारांचा गैरवापर करून अनधिकृत बांधकामास अभय दिल्याचा ठपका दोघांवर ठेवण्यात आला आहे.

मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचे स्खलन होऊन 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पाची अनधिकृत इमारत कोसळून नऊ कामगारांचा मृत्यू झालेल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने समितीची स्थापना केली आहे. पुण्याच्या विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीला एक महिन्याच्या आत प्राथमिक अहवाल, तर दोन महिन्यात अंतिम अहवाल सादर करण्याचे आदेश नगरविकास विभागाने दिले आहेत.

### समितीचे अधिकार

» महापालिकेच्या कोणत्याही विभागाकडून आवश्यक कागदपत्रे, करारपत्रे, नकाशे, सीसीटीव्ही फुटेज, ड्रोन सर्वे आणि ऑनलाइन दस्तऐवज मागवणे, प्रत्यक्ष घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक मोजमापे आणि नमुने गोळा करणे, संबंधित अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे जबाब नोंदवणे, महापालिकेचे सर्व विभागप्रमुख आणि कर्मचाऱ्यांना या चौकशीत समितीला संपूर्ण सहकार्य करणे बंधनकारक करण्यात आले आहे. एक महिन्यात प्राथमिक आणि संपूर्ण शिफारसी आणि जबाबदारी निश्चितीच्या शिफारशीसह दोन महिन्यात अंतिम चौकशी अहवाल राज्य शासनाकडे सुपूर्द करण्याचे आदेश दिले आहेत.

# पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एटीएसचे मोठे छापे; पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टीच्या नेटवर्कवर कारवाई

## राज्यभर 65 ठिकाणी एकाचवेळी कारवाई; सोशल मीडियाद्वारे तरुणांशी संपर्काचा संशय, मोबाईल-लॅपटॉप जप्त

**पुणे | प्रतिनिधी**

दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टीशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या एका नेटवर्कचा पर्दाफाश करण्यासाठी महाराष्ट्रभर मोठी कारवाई हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यातील ६५ ठिकाणी, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरामध्ये २३ ठिकाणी एकाचवेळी धडक छापे टाकण्यात आले.

प्राथमिक माहितीनुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा




वापर करून संबंधित नेटवर्क कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम आणि व्हॉट्सॲप यांसारख्या माध्यमांतून स्थानिक तरुणांशी संपर्क साधून त्यांच्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती.

या पार्श्वभूमीवर एटीएसने व्यापक शोधमोहीम राबवत अनेक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. कारवाईदरम्यान मोबाईल फोन, लॅपटॉप, बँक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रे तसेच इतर काही संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले असल्याचे समजते.

दरम्यान, या नेटवर्कच्या संभाव्य देशविघातक हालचाली, आर्थिक व्यवहार आणि सोशल मीडियावरील संपर्कांची सखोल चौकशी सुरू असून एटीएसकडून पुढील तपास वेगाने करण्यात येत आहे. या कारवाईमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

# कर्जत, खालापूर तालुक्यातील नुकसानीचे तातडीने पंचनामे करा : खासदार श्रीरंग बारणे

## कर्जत-खालापूरमधील शेती, रस्ते व पायाभूत सुविधांच्या नुकसानीचा आढावा; अहवाल तातडीने शासनाकडे पाठविण्याच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कर्जत, खालापूर तालुक्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेत जमीन, भाताची रोपे वाहून गेली आहेत. फळ बागांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत. त्याबाबतचा अहवाल तत्काळ शासनाला पाठविण्याचे आदेश मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा प्रशासकीय इमारत खालापूर येथे बुधवारी आढावा घेतला. कृषी, सार्वजनिक बांधकाम विभाग, वैद्यकीय, आरोग्य, महावितरण सर्व विभागांची बैठक घेतली. आमदार महेंद्रशेठ थोरवे, उपविभागीय अधिकारी कर्जत खालापूर प्रकाश सकपाळ, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, कर्जत तहसीलदार धनंजय जाधव, कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, खोपोली नगरपरिषद मुख्याधिकारी पंकज पाटील, खालापूर नगरपंचायत मुख्याधिकारी कोमल कराळे, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, रसायनी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय बांगर, गट विकास अधिकारी खालापूर संदिप कराळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय उप अभियंता संदेश पाटील, मोरबे नवी मुंबईचे कार्यकारी अभियंता संतोष उनवणे, तालुका आरोग्य अधिकारी कल्याणी इंगोले, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता काळेल, एमआयडीसी पातळगंगा अग्निशमन दलाचे स्टेशन अधिकारी आशिष मोरे, खालापूर नगरपंचायत नगराध्यक्षा रोशमताई मोडवे, शिवसेना खालापूर तालुका संपर्क प्रमुख विजाभाऊ पाटील, शिवसेना खालापूर तालुका प्रमुख संदेश पाटील, शिवसेना महिला आघाडी खालापूर तालुका प्रमुख रेश्माताई आंग्रे, मोतीरा ठोंबरे, उमेश गायकवाड, रोहित विचारे व सबंधित अधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, कर्जत, खालापूर या तालुक्यांमध्ये ३, ४, ५, ६ जुलै रोजी अतिवृष्टी झाली. यामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेत जमीन वाहून गेली, बंधारा फुटाला, भाताचे रोपे वाहून गेली. फळ बागांचे नुकसान झाले. या तालुक्यांमधील रस्ते, साकव, छोट्या पुलावांरुन पाणी गेले. पुलाचे संरक्षक कठडे वाहून गेले आहेत. अनेक ठिकाणचे लोखंडी कठडे वाकले आहेत नदीलगतच्या स्मशानभूमीकडे जाणारे रस्ते वाहून गेले. खोपोली शहरातील अनेक भागात पाणी शिरले होते. पाणीपुरवठा योजना बंद पडली. त्यावर तत्काळ कार्यवाही करावी. रस्ते दुरुस्त करावेत. दोन दिवस वीजपुरवठा खंडित झाला होता. त्याची तत्काळ दुरुस्ती करावी. पुन्हा वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची काळजी घ्यावी. अतिवृष्टीत दोन्ही तुालक्यात चार जणांचा मृत्यू झाला आहे. त्यांना शासनाच्या वतीने तत्काळ मदत केली आहे. नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचा अहवाल शासनाला सादर केल्यानंतर नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळवून दिली जाईल.



### आदिवासी पाड्यातील नागरिकांचे पुनर्वसन..

**» खालापूर तालुक्यात माथेरान डोंगरलागत आदिवासीपाडे आहेत. तेथे जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. येथील नागरिकांच्या पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांबरोबर लवकरच बैठक घेतली जाईल. राज्य शासनाच्या संबंधित मंत्र्यांबरोबरही बैठक घेतली जाणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.**

> **आपत्ती व्यवस्थापनाबाबतचे शासनाचे निर्देश पाळावेत. नुकसानग्रस्तांचे तातडीने पंचनामे करुन अहवाल पाठविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. अहवाल आल्यानंतर शासनाकडून मदत मिळवून दिली जाईल.**
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार**

> **नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत. नुकसानग्रस्तांना मदत करावी. महावितरणचे अधिकारी जागेवर नसतात. महावितरणने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात. वीजपुरवठा खंडीत होणार नाही, याची काळजी घ्यावी.**
>
> **- महेंद्र थोरवे, आमदार**

# 'पीएमआरडीए'ची मोई येथे सर्वात मोठी कारवाई; 680 अनधिकृत पत्राशेड जमीनदोस्त..!

## 35 हेक्टर क्षेत्र अतिक्रमणमुक्त; 1,000 अधिकारी-कर्मचाऱ्यांसह 20 तासांची विक्रमी धडक कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) खेड तालुक्यातील मोई येथे अनधिकृत पत्राशेडविरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी धडक कारवाई केली. सलग दोन दिवस चाललेल्या या मोहिमेत सुमारे ३५ हेक्टर क्षेत्रावरील ६८० अनधिकृत पत्राशेड जमीनदोस्त करण्यात आली. या धडक कारवाईमुळे बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या नेतृत्वाखाली तसेच अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी आणि पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली १३ व १४ जुलै रोजी ही मोहीम राबविण्यात आली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने चोख नियोजन केले होते.

या कारवाईसाठी ६५० पोलीस अधिकारी व कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे (एमएसएफ) ५० जवान, राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सुरक्षा रक्षक आणि 'पीएमआरडीए'च्या अग्निशमन दलाचे ३० जवान तैनात करण्यात आले होते. सुरक्षेच्या उपाययोजनांचा भाग म्हणून अग्निशमन दलाच्या तीन गाड्या आणि महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आले होते. जेसीबी, पोकलॅन मशीन आणि मजुरांच्या साहाय्याने अनधिकृत पत्राशेड हटविण्यात आली. पिंपरी-चिंचवड महापालिका, खेड येथील विद्युत पुरवठा विभाग, आरोग्य विभाग आणि खेड पंचायत समिती यांच्या समन्वयातून ही कारवाई पूर्ण करण्यात आली.

कारवाईच्या अंमलबजावणीसाठी 'पीएमआरडीए'चे दक्षता अधिकारी तथा पोलीस अधीक्षक अमोल झेंडे, पिंपरी-चिंचवडचे अपर पोलीस आयुक्त बसवराज तेली, पोलीस उपआयुक्त श्वेता खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया ढमाळे, 'पीएमआरडीए'चे सहआयुक्त हिम्मत खराडे, मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, महाळुंगेचे पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, तहसीलदार रवींद्र रांजणे, तहसीलदार आशा होळकर, उपअभियंता रितेश मुंढे आणि तपन डंके आदी अधिकारी दोन्ही दिवस घटनास्थळी उपस्थित होते.



> **'पीएमआरडीए'च्या हद्दीत बेकायदेशीर पत्राशेड अथवा बांधकामे खपवून घेतली जाणार नाहीत. मोई परिसरातील कारवाई ही धडक मोहिमेचा एक भाग आहे. नागरिकांनी अशा अनधिकृत बांधकामांच्या आमिषाला बळी पडू नये. 'पीएमआरडीए'तर्फे आगामी काळातही अशी कडक कारवाई सुरूच राहील.**
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार**

# पुणेकरांना मिळणार नियमित पाणी ! 24 तासांत 'यू-टर्न' काय घडले..

## महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या घोषणेनंतर भाजप पदाधिकाऱ्यांसह सजग नागरिक मंचाचा तीव्र आक्षेप.

**पुणे | प्रतिनिधी**

'शहरात दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय तूर्तास स्थगित करण्यात आला असून, २२ जुलैनंतर या निर्णयाचा पुन्हा आढावा घेण्यात येईल,' अशी माहिती महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिली. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी पुण्यात पुन्हा दिवसाआड पाणीपुरवठा करणार असल्याचे सोमवारी जाहीर केले. मात्र, त्याच्या दुसऱ्याच दिवशी महापौरांनी ही पाणीकपात रद्द करण्याची घोषणा केली.

महापालिकेने पालखी सोहळ्यासाठी गेल्या आठवड्यात शहरातील पाणीकपात तात्पुरती रद्द करण्याचा निर्णय घेतला. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी धरणात केवळ ५० टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून दिवसाआड पाणीकपात पुन्हा सुरू करावी लागणार असल्याचे सोमवारी स्पष्ट केले. आयुक्तांच्या या घोषणेनंतर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. खडकवासला धरणातून कालव्याच्या माध्यमातून विसर्ग सुरू असताना दुसरीकडे पुणेकरांना दिवसाआड पाणी का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.



### सर्वपक्षीय बैठकीनंतर अंतिम निर्णय

» 'पाणीकपात लागू करायची की नाही, याबाबतचा अंतिम निर्णय २२ जुलैनंतर सर्वपक्षीय बैठक आणि प्रशासनाशी चर्चा करून घेतला जाणार आहे. महापौरांनी नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. दरम्यान, सजग नागरिक मंचानेही पाणीकपातीला विरोध दर्शवत धरणांत पुरेसा साठा असताना दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले असून, हा निर्णय टँकर व्यवसायाला चालना देणारा ठरू शकतो, अशीही भूमिका मांडली आहे.

हवामान खात्यानेदेखील १९ जुलैनंतर पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे २२ जुलैपर्यंत पाणीकपात न करता नियमित पाणी देण्यात यावे, असे आदेश प्रशासनाला दिल्याचे महापौर नागपुरे यांनी सांगितले.

नागरिकांना नियमित पाणीपुरवठा करण्याचे आदेश त्यांनी महापालिका प्रशासनाला दिले. यामुळे पुणेकरांना दिलासा मिळणार आहे. पुढील आठवड्यात हवामान विभागाने पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यानुसार पावसाचा अंदाज घेऊन, सर्वपक्षीय सदस्यांची बैठक घेऊन आणि प्रशासनाबरोबर चर्चा करून २२ जुलैनंतर पाणीकपात सुरू करायची की रद्द करायची याचा निर्णय घेतला जाईल,' असे महापौर नागपुरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील पाणीसाठा घटत असल्याने आणि यंदा हवामान खात्याने उशिरा आणि कमी पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तविल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून महापालिकेने १५ जूनपासून पुणे शहरात पाणीकपात सुरू केली. मात्र, जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली. गेल्या महिन्यात १५ जून रोजी धरणात केवळ साडेतीन टीएमसी पाणीसाठा शिल्लक होता. त्यामध्ये वाढ झाली असून, सद्यःस्थितीला साडेसोळा टीएमसी इतका पाणीसाठा धरणात आहे.

### २२ जुलैपर्यंत पाणीकपात स्थगित

» महापौर मंजूषा नागपुरे यांनी पुणे शहरातील दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय २२ जुलैपर्यंत स्थगित करण्याची घोषणा केली आहे. धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध असल्याने नागरिकांना सध्या नियमित पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. हवामान विभागाने १९ जुलैनंतर पावसाचा अंदाज व्यक्त केल्यामुळे घाईने पाणीकपात लागू न करण्याचा निर्णय घेण्यात आला. २२ जुलैनंतर पाणीसाठा आणि पावसाची स्थिती पाहून पुढील निर्णय घेतला जाईल.

### धरणांतील पाणीसाठा दिलासादायक

» खडकवासला धरणसाखळीतील पाणीसाठा सध्या सुमारे १६.५ टीएमसी इतका असून, तो एकूण क्षमतेच्या जवळपास ५० टक्के आहे. अलीकडील मुसळधार पावसामुळे धरणांतील साठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. खडकवासला धरण ९० टक्के भरल्याने कालव्याद्वारे पाण्याचा विसर्गही सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शहरात तातडीने दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची गरज नसल्याचे मत लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून व्यक्त करण्यात आले.

---

# पुणे महापालिकेच्या 59 हजार विद्यार्थ्यांच्या खात्यावर 22.98 कोटींचा डीबीटी निधी जमा

## गणवेश, दप्तर, वह्या-साहित्य खरेदीसाठी विद्यार्थ्यांना थेट लाभ; माध्यमिक विभागातील 12 हजार विद्यार्थ्यांची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिका शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीतील ५९ हजार ७९५ विद्यार्थ्यांच्या किंवा त्यांच्या पालकांच्या बँक खात्यावर वैयक्तिक लाभ योजनेअंतर्गत (डीबीटी) २२ कोटी ९८ लाख २ हजार ६८४ रुपये जमा करण्यात आले आहेत.




या निधीतून आवश्यक शालेय साहित्य तातडीने खरेदी करून त्याच्या पावत्या संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे जमा कराव्यात, असे आवाहन स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी केले.

महापालिकेने इयत्तानिहाय निधी विद्यार्थ्यांच्या खात्यावर वर्ग केला असून, या रकमेतून गणवेश, दप्तर, बूट, मोजे, वह्या, रंगपेटी, चित्रकला साहित्य, स्टेशनरी, लिखाण साहित्य तसेच दर दोन वर्षांनी स्वेटर खरेदी करता येणार आहे. विद्यानिकेतन आणि क्रीडा निकेतन शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या विशेष गरजांनुसार साहित्य स्वतंत्रपणे उपलब्ध करून दिले जाणार आहे.

भिमाले यांनी सांगितले की, बालवाडी-१, बालवाडी-२, इयत्ता पहिलीतील नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थी तसेच यू-डायस प्रणालीवरील कायमस्वरूपी विद्यार्थी नोंदणी क्रमांक (पेन) तयार होण्याची प्रक्रिया सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या खात्यावर पेन क्रमांक उपलब्ध होताच डीबीटीद्वारे निधी जमा केला जाईल.

तसेच, माध्यमिक विभागातील सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांसाठी डीबीटीची बिलिंग प्रक्रिया सुरू असून, ती १५ ऑगस्टपूर्वी पूर्ण केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यंदा डीबीटी प्रक्रिया १८ जूनपासून सुरू करण्यात आली होती. विधान परिषद निवडणुकीच्या आचार संहितेमुळे काहीसा विलंब झाला असला, तरी मागील तीन वर्षांच्या तुलनेत यंदा शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा करण्याचा महापालिकेचा प्रयत्न यशस्वी झाल्याचे भिमाले यांनी सांगितले.

# पालखी सोहळ्यातील दिंड्यांना यंदाही अनुदान

## 2.80 कोटींचे थेट खात्यात वितरण सुरू, मुख्यमंत्री वारकरी महामंडळाचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री वारकरी महामंडळामार्फत गेल्या दोन वर्षांपासून मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या दिंड्यांना देण्यात येणारे अनुदान या वर्षीही निरंतर सुरू ठेवण्यात आले असून, विभागीय आयुक्त पुणे तथा व्यवस्थापकीय संचालक, मुख्यमंत्री वारकरी महामंडळ यांच्या देखरेखीखाली या निधीचे थेट बँक खात्यात वाटप सुरू करण्यात आले आहे.


शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत नव्याने स्थापन झालेल्या मुख्यमंत्री वारकरी महामंडळामार्फत तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशी वारी सन २०२६ करिता मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या दिंड्यांना दिलासा देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

दि. २ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार या वर्षी वारीकरिता येणाऱ्या दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपयेप्रमाणे एकूण २ कोटी ८० लाख रुपये इतके वित्तीय अनुदान वितरित करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

ज्या दिंड्यांचे बँक तपशील अद्याप प्राप्त झालेले नाहीत, अशा दिंडी प्रमुखांनी आपले बँक खाते आणि आवश्यक तपशील संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे किंवा विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्याकडे त्वरित सादर करावेत, जेणेकरून अनुदानाची रक्कम थेट बँक खात्यात विनाविलंब जमा करता येईल,असे आवाहन विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

चालू वर्षामध्ये एकूण १ हजार ४०० दिंड्यांना हे अनुदान वितरित करण्याचे उद्दिष्ट आहे. सद्यःस्थितीत एकूण १ हजार १९९ पात्र दिंड्यांपैकी १ हजार दिंड्यांचे बँक तपशील प्राप्त झाले असून त्यांच्या खात्यात थेट रक्कम वर्ग करण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहे.

उर्वरित १९९ दिंड्यांच्या बँक खात्यांचे तपशील प्राप्त होताच तत्काळ निधी वर्ग करण्यात येईल. तसेच, वारीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ४१ नवीन दिंड्यांच्या बाबतीतही आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.




### बँक तपशील त्वरित सादर करा

» ज्या दिंडी प्रमुखांनी अद्याप बँक खाते आणि आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत, त्यांनी ती त्वरित विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडे जमा करावीत, असे आवाहन विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे. तसेच, यंदा वारीत नव्याने सहभागी झालेल्या ४१ नवीन दिंड्यांच्या अनुदानासाठीही आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### २.८० कोटींच्या अनुदानाला मंजुरी

» मुख्यमंत्री वारकरी महामंडळामार्फत आषाढी वारी २०२६ साठी मानाच्या १० पालख्यांसोबत सहभागी होणाऱ्या दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने २ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय व वित्तीय मंजुरी दिली असून, ही रक्कम थेट दिंडींच्या बँक खात्यात जमा केली जात आहे. वारकरी संप्रदायाला आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने सलग तिसऱ्या वर्षी ही योजना राबविण्यात येत आहे.

### १,४०० दिंड्यांना लाभ

» यंदा राज्यातील १,४०० दिंड्यांना अनुदान देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी १,१९९ पात्र दिंड्या निश्चित झाल्या असून १,००० दिंड्यांचे बँक तपशील प्रशासनाला प्राप्त झाले आहेत. या दिंड्यांच्या खात्यात निधी वर्ग करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. उर्वरित १९९ दिंड्यांचे बँक तपशील मिळताच त्यांनाही तातडीने अनुदान वितरित करण्यात येणार आहे.

---

# चाकणमधील कोंडीतून सुटका! आंबेठाण चौक, तळेगाव चौक, आळंदी फाटा ते वासोली पीएमपीचा नवीन ‘वर्तुळाकार मार्ग’

## खासगी वाहनांचा वापर कमी होऊन वेळेची बचत होणार; 'फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज'च्या मागणीला यश.

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक क्षेत्रात (एमआयडीसी) सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम नसल्याने कामगारांना खासगी वाहतुकीशिवाय दुसरा पर्याय नाही. यामुळे खासगी वाहनांचा वापर वाढून वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. यातून कामगारांचा दररोज सुमारे एक तास वेळ वाहतूक कोंडीत वाया जातो. आता ही समस्या सोडविण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडने (पीएमपीएमएल) पाऊल उचलले असून, नवीन वर्तुळाकार मार्गावर विशेष बससेवा सुरू केली आहे. यामुळे चाकण एमआयडीसीतील हजारो कामगारांचा प्रवास सुकर होणार आहे.

चाकणमध्ये पीएमपीची वर्तुळाकार मार्ग सेवा आधी सुरू होती. मात्र, या सेवेला अत्पल्प प्रतिसाद मिळत असल्याने ती बंद करण्यात आली. त्यानंतर फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजने पुन्हा सेवा सुरू करण्याची मागणी केली. एमआयडीसीतील कामगारांसाठी पीएमपीची सेवा आवश्यक असल्याची आग्रही भूमिका संघटनेने घेतली. याबाबत मे महिन्यात पीएमपीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीत पुन्हा सेवा सुरू करण्यासाठी मार्गाचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जून महिन्यात चाकण एमआयडीसीत नवीन मार्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणानंतर चाकण एमआयडीसीत बसचा वर्तुळाकार मार्ग निश्चित करण्यात आला, अशी माहिती पीएमपीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

चाकण एमआयडीसीत टप्पा क्रमांक दोनमध्ये आंबेठाण चौक ते वासोली या वर्तुळाकार मार्गावरील विशेष बससेवा सोमवारपासून (दि.१३) सुरू करण्यात आली. यावेळी पीएमपीचे विभागीय व्यवस्थापक राजेश जाधव, पिंपरी-चिंचवडचे आगार व्यवस्थापक शैलेंद्र नाईक, शिंदे गावच्या सरपंच संगीता केंदळे आणि फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे मुख्याधिकारी दिलीप बटवाल व संचालक विनोद जैन उपस्थित होते. पीएमपीने या वर्तुळाकार मार्गासाठी सध्या सहा बस उपलब्ध करून दिल्या आहेत. या मार्गावर दर अर्ध्या तासाला बस धावणार आहेत.



### वेळेची बचत होणार

» चाकण एमआयडीसीतील पीएमपीच्या वर्तुळाकार मार्ग बससेवेमुळे परिसरातील हजारो कामगार व नागरिकांचा सार्वजनिक वाहतुकीचा प्रश्न निकाली निघाला आहे. कामगारांना सुरक्षित व भरवशाची प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे खासगी वाहनांचा वापर कमी होण्यास मदत होईल. यातून वाहतूक कोंडीची समस्या कमी होऊन कामगारांचा प्रवासात वाया जाणारा वेळ कमी होईल, असे फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे मुख्याधिकारी दिलीप बटवाल यांनी सांगितले.